# आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

जुने जकात घर, २ रा मजला, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ०२३.

विषय:- वाढीव मळी निर्लेखीत करणेबाबत.

## परिपत्रक

क्रमांक:- मळी ११२०१६/१२८६/२९/५-अ मुंबई, दिनांक 05 मे, २०१६.

राज्यातील साखर कारखान्यांनी उत्पादीत केलेली मळी बाळगणे व विक्री करणे याकरिता मुंबई मळी नियमावली, १९५५ मधील नियम ३ (२) नुसार आयुक्तांच्या पूर्व मान्यतेने जिल्हाधिकारी एम-१ अनुज्ञप्ती मंजुर करतात. सदर एम-१ अनुज्ञप्ती अंतर्गत मळीची साठवणूक, इत्यादी बाबतचे दैनंदिन व्यवहाराची नोंद याच नियमातील नियम ३८ (३) मधील तरतुदीनुसार नमुना एम-अ मध्ये करणे आवश्यक असून साठवणूक नमुना एम-ब मध्ये करणे आवश्यक आहे. तसेच नियम ३८ (४) नुसार प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेस किंवा तत्पूर्वी नमुना एम-क मध्ये तक्ता तयार करुन त्यात नोंदी घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त नुसार कार्यवाही करताना राज्यातील एम-१ घटक त्यांनी उत्पादीत व विक्री केलेल्या मळीची पुस्तकी नोंद व प्रत्यक्षातील साठा यामध्ये तफावत आढळल्यामुळे वाढीव मळीची नोंद घेण्याकरिता व ती निर्लेखित करुन विक्री करण्याकरिता परवानगी देण्यासाठी अनेक विनंती अर्ज प्राप्त होतात. सदर वाढीव मळीकरिता सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे कारणे नमुद करण्यात येतात.

i. गळीत हंगामामध्ये प्रत्येक शिफ्ट संपल्यानंतर सेंट्रीफ्युगल मशिनला स्टीम व पाणी लावून साफ कराव्या लागल्यामुळे.

ii. मळीची घनता (ब्रिक्स) जास्त असल्यामुळे ही मळी पाईपलाईनमधून सहजरित्या प्रवाहित व्हावी यासाठी पाईपलाईनला मधून मधून स्टीम द्यावी लागल्यामुळे.

iii. मळीला उष्णतेने फोम आल्याने अचूक मोजमाप घेता येत नाही.

iv. हिवाळयात मळी घट्ट झाल्याने गरम पाणी फवारावे लागते.

v. वेईंग स्केल नादुरुस्त झाल्याने मोजमाप अचूक झाले नाही.

उपरोक्त नमुद केल्यानुसार वाढीव मळी संदर्भात जवळजवळ सारखीच कारणे सर्व घटकांकडून दिली जातात. वास्तविक दैनंदिन व्यवहारांची नोंद घेताना अशा प्रकारे तफावत आढळली तर त्याच वेळी ती निदर्शनास आणणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र मळीची साठवण व पुरवठा विनियम, १९६५ मधील नियम १४ (१) मधील (ii) नुसार २% पेक्षा जास्त तफावत नसेल तेव्हा अधीक्षक परवानगी देऊ शकतात. परंतु २% पेक्षा जास्त प्रमाण असल्यास त्याकरिता परवानगी देण्याचे अधिकार आयुक्तांना आहेत. परंतु मागील काही वर्षापासून प्राप्त झालेल्या

अर्जावरुन वाढीव मळीचे प्रमाण २% पेक्षा किती तरी प्रमाणात जास्त आढळले आहे. याचे महत्वाचे कारण वाफ व पाण्याचा वापर जास्त प्रमाणात केला आहे. **तरी या परिपत्रकान्वये सूचना देण्यात येत आहेत की, वाढीव मळीचे प्रमाण उत्पादनाच्या ५% पेक्षा जास्त असल्यास सदर मळी निर्लेखित करुन विक्री करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.** एम-१ घटकानी त्यांच्या कडील उत्पादीत, विक्री झालेल्या व शिल्लक असलेल्या मळीचे अचूक मोजमाप करावे व त्याबाबत विहीत नमुन्यात दैनंदिन नोंदी घ्याव्यात. यापुढे ५% पेक्षा जास्त प्रमाणात वाढीव मळी आढळली तर संबंधित घटकाचे व्यवहार तपासण्यात येतील व नोंदी घेण्यात निष्काळजीपणा आढळल्यास किंवा संशयास्पद बाबी आढळल्यास संबंधित घटकाविरुध्द सक्त कारवाई प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी. त्यामुळे यामुळे कोणत्याही परिस्थितीत वाढीव मळीचे प्रमाण ५% पेक्षा जास्त होऊ शकणार नाही याची दक्षता घ्यावी, तरी सदर बाब विचारात घेऊन अचूक नोंदी घेण्याची दक्षता घ्यावी.

सदर परिपत्रकाची पोच द्यावी.

( विजय सिंघल )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
१) सर्व जिल्हाधिकारी.
२) सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
३) सर्व जिल्हा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
४) सर्व एम-१ अनुज्ञप्तीधारक (मार्फत संबंधीत अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.)
५) आयुक्तालयातील अभिलेख शाखा. ५ प्रती सह.

प्रत,
या कार्यालयातील सह संचालक(संगणक व सांखिकी) विभाग यांनी सदरचे परिपत्रक विभागाच्या वेबसाईट वर अपलोड करुन घ्यावी.